श्री शिवाजी शिक्षक प्रसारक मंडळ संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन,बार्शी

शैक्षणिक वर्ष २०२५-२६

## “जिमखाना अहवाल”

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी मध्ये शैक्षणिक वर्षाची सुरुवात केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या विद्यार्थी विकास विभागाच्या दि. ११/०६/२०२५ च्या पत्रानुसार ‘योग संगम’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच २९ ऑगस्ट २०२५ रोजी मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. नोकरी मार्गदर्शन कक्ष द्वारे प्रशिक्षणार्थींसाठी नोकरी व व्यवसाय मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी चे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. निंबाळकर हे उपस्थित होते. महाविद्यालयामध्ये दिनांक १९ व २० सप्टेंबर २०२५ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यामध्ये पुरुष गटाचे ६ संघ व महिला गटाचे ७ संघ सहभागी झाले. या स्पर्धेसाठी स्पर्धा सचिव म्हणून एम.पी.एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. एम. लांडगे यांनी काम पाहीले. महाविद्यालयामध्ये संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी कर्मवीर जलतरण स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यात आल्या. यामध्ये माध्यमिक स्तरावर दोन गट करण्यात आले होते तसेच उच्च माध्यमिक गट व महाविद्यालयीन गट यामध्ये मुलं व मुले अशा गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी फ्रीस्टाइल, बॅकस्ट्रोक, ब्रेस्ट स्ट्रोक व बटरफ्लाय असे जलतरणाचे प्रकार घेण्यात आले. यासाठी ५० मीटर, १०० मीटर, २०० मीटर व ८०० मीटर या अंतराच्या स्पर्धा घेण्यात आल्या. एकूण ४८ प्रशिक्षित स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये यशस्वीपणे सहभाग नोंदवला. तसेच कर्मवीर केसरी कुस्ती स्पर्धेचे ही आयोजन २३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले या स्पर्धेमध्ये सर्व गटात मिळून एकूण ९५ पुरुष व १८ महिला मल्लांनी सहभाग नोंदविला या स्पर्धा एकूण चार गटांमध्ये आयोजित करण्यात आल्या. प्राथमिक गट, माध्यमिक गट मुले व मुली तसेच उच्च माध्यमिक गट व महाविद्यालयीन गट पुरुष व महिला अशा स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच रोटरी क्लब ऑफ बार्शी व कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ व १८ जानेवारी २०२६ रोजी कर्मवीर जिम्नॅशियम हॉल, बार्शी येथे “बार्शी ओपन टेबल टेनिस स्पर्धा २०२५–२६” चे भव्य आयोजन करण्यात आले होते.

या दोन दिवसीय स्पर्धेत ११, १३, १५, १७, १९ वर्षांखालील गट, खुला गट तसेच ४० वर्षांवरील (व्हेटरन) गटामधील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सातारा (४५), कोल्हापूर (४७), बार्शी (५१), सोलापूर (३५), बीड (३४), अहिल्यानगर (३०), धाराशिव (७), पुणे (५), बिदर (५), लातूर (२८), नांदेड (२४), परभणी (७), छत्रपती संभाजीनगर (१०) व हुबळी (२) अशा विविध शहरांमधून एकूण ३३० खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

या वर्षी गत वर्षी प्रमाणे संस्थेच्या प्रेरणेने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त राज्यस्तरीय निमंत्रित महिला खो-खो स्पर्धांचे भव्य आयोजन महाविद्यालयाद्वारा करण्यात आले यामध्ये कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी, महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व ॲम्यूचर खो-खो असोसिएशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने

तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या द्वारे पी.एम.उषा. या योजने अंतर्गत आर्थिक सहकार्याने या राज्यस्तरीय निमंत्रित महिला खो-खो स्पर्धांचे यशस्वीरित्या आयोजन दि. २० ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले. या स्पर्धेमध्ये एकूण आठ निमंत्रित संघानी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी स्पर्धा सचिव म्हणून डॉ. एस. एस. मारकड तसेच पी.एम.उषा. समन्वयक म्हणून श्रीम. डॉ. एस. एस. सुरवसे यांनी काम पाहीले.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याद्वारा आयोजित करण्यात आलेल्या विविध अंतर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये तसेच राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव, विभागीय अंतर विद्यापीठ स्पर्धा, अखिल भारतीय स्तर अंतर विद्यापीठ स्पर्धांमध्ये कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शीच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदविला तसेच आपले क्रीडा नैपुण्य दाखविले ते खालील प्रमाणे:

**क्रीडा प्राविण्य तक्ता**

| अ.क्र. | विध्यार्थांचे नाव | वर्ग | क्रीडा प्रकार | प्राविण्य स्तर |
|---|---|---|---|---|
| १ | निखील कल्पना बजरंग कुरडे | बी.पी.एड. भाग २ | थाळी फेक | आंतर महाविद्यालयीन स्तर **प्रथम, क्रीडा महोत्सव सहभाग** |
| २ | वैभवी शोभा विजय माने | बी.पी.एड. भाग २ | ८४ किलो वरील वजन गट जुदो | आंतर महाविद्यालयीन स्तर **प्रथम, पश्चिम विभागीय स्तर सहभाग** |
| ३ | दिपाली रोहिणी शिवाजी मदने | बी.पी.एड. भाग २ | ५३ व ५७ किलो वजन गट तायक्वांदो | आंतर महाविद्यालयीन स्तर **प्रथम, अखिल भारतीय स्तर सहभाग** |
| ४ | संतोष दिपाली चंद्रकांत जाधव | बी.पी.एड. भाग २ | ६८ किलो वजन गट तायक्वांदो | आंतर महाविद्यालयीन स्तर **प्रथम, अखिल भारतीय स्तर सहभाग** |
| ५ | श्वेता कविता खुशाली वेलीप | बी.पी.एड. भाग १ | खो–खो | **क्रीडा महोत्सव सहभाग** |
| ६ | ऋतुजा कालिंदा नागनाथ हाके | बी.पी.एड. भाग १ | खो–खो | **क्रीडा महोत्सव सहभाग** |
| ७ | दिशा वंदना प्रकाश कारंडे | बी.पी.एड. भाग १ | ५९ किलो वजन गट **free style** कुस्ती | आंतर महाविद्यालयीन स्तर **प्रथम** |
| ८ | जयराम संगीता दिगंबर दळवी | बी.पी.एड. भाग २ | खो–खो | **पश्चिम विभागीय स्तर सहभाग** |
| ९ | सनी लता बापू जाधव | बी.पी.एड. भाग २ | कबड्डी | **पश्चिम विभागीय स्तर सहभाग** |
| १० | विवेक तेजल विलास खोत | बी.पी.एड. भाग २ | कबड्डी | **क्रीडा महोत्सव व पश्चिम विभागीय स्तर सहभाग** |
| ११ | श्रद्धा विजयालक्ष्मी मदन पवार | बी.पी.एड. भाग २ | बेसबॉल व softball | **अखिल भारतीय स्तर व पश्चिम विभागीय स्तर सहभाग.** |
| १२ | प्रणाली वर्षा विलास फाटक | बी.पी.एड. भाग २ | बेसबॉल व softball | **अखिल भारतीय स्तर सहभाग.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | मोहित शोभा गजानन मक्तेदार | बी.पी.एड. भाग २ | गतका | आंतर महाविद्यालयीन स्तर सांघिक द्वितीय |
| १४ | प्रथमेश सुरेखा माधव दळवी | बी.पी.एड. भाग २ | गतका | आंतर महाविद्यालयीन स्तर सांघिक द्वितीय व वैयक्तिक तृतीय. |
| १५ | राहुल वनिता दिगंबर रेंदाले | बी.पी.एड. भाग २ | गतका | आंतर महाविद्यालयीन स्तर सांघिक द्वितीय |
| १६ | जयराम संगीता दिगंबर दळवी | बी.पी.एड. भाग २ | गतका | आंतर महाविद्यालयीन स्तर सांघिक द्वितीय |
| १७ | सृष्टी सुनिता तानाजी पवार | बी.पी.एड. भाग १ | कराटे | आंतर महाविद्यालयीन स्तर प्रथम, पश्चिम विभागीय स्तर सहभाग. |
| १८ | आकांक्षा शोभा अनिल मुळीक | बी.पी.एड. भाग १ | ४०० मी. हर्डल्स | आंतर महाविद्यालयीन स्तर प्रथम |
| १९ | शर्वरी स्वाती श्रीमंत तवर | बी.पी.एड. भाग २ | ४०० मी. हर्डल्स | आंतर महाविद्यालयीन स्तर द्वितीय |
| २० | वैष्णवी जयश्री शिवाजी शिंदे | बी.पी.एड. भाग १ | तिहेरी उडी | आंतर महाविद्यालयीन स्तर द्वितीय |
| २१ | ऋतुजा कालिंदा नागनाथ हाके | बी.पी.एड. भाग १ | खो–खो | पश्चिम विभागीय स्तर सहभाग. |
| २२ | श्वेता कविता खुशाली वेलीप | बी.पी.एड. भाग १ | खो–खो | पश्चिम विभागीय स्तर सहभाग. |
| २३ | चंद्रशेखर भामाबाई सुमंतराव डाके | बी.पी.एड. भाग २ | १० मी. एअर पिस्टल | अखिल भारतीय स्तर सहभाग |

संकलन
**डॉ. पी. पी. नरळे**
जिमखाना विभाग प्रमुख

College of Education, Barshi, Dist. Solapur 413411

I/C. Principal
College of Education, Barshi
Dist. Solapur 413411